# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन, २०२६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### महाज्योतीचे शेतीपुरक व्यवसाय व उद्योग उभारणीकडे दुर्लक्ष होत असल्याबाबत

**(१) २५९७ (१८-०७-२०२५) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाज्योती योजनेंतर्गत शेतकऱ्यांसाठी शेतीपूरक व्यवसाय उभे करण्याची योजना असूनही त्यादृष्टीने त्याची अंमलबजावणी होत नसून मागास प्रवर्गातील उद्योजकांसाठीही प्रयत्न झाले नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शैक्षणिक विषय सोडून शेती, उद्योग याकडे दुर्लक्ष होण्याची कारणे काय आहेत,

(३)असल्यास, महाज्योतीतर्फे शेतीपूरक व्यवसाय व उद्योजक घडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.अतुल सावे (१३-०३-२०२६) :** (१) व (२) महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर या संस्थेमार्फत इतर मागास वर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ व्हावी या हेतूने ‘‘करडई तेलबिया उत्पादन व प्रक्रिया प्रकल्प’’ हा महाराष्ट्रातील चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा, नागपूर, अमरावती, वाशिम या जिल्ह्यांमध्ये राबविण्यात आलेला आहे. सदर प्रशिक्षणाद्वारे एकूण ६९४९इतक्या शेतकऱ्यांनी करडईची पिकाची पेरणी करुन उत्पादन घेतले आहे. त्यानुसार शेतकऱ्यांना रुपये ५१,१६,२००/- एवढ्या प्रोत्साहन भत्याचे वाटप करण्यात आले आहे.

(३) शेतीपुरक व्यवसाय व उद्योजक घडविण्यासाठी महाज्योती या कार्यालयामार्फत खालील प्रशिक्षण देण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

१.महाज्योती या संस्थेमार्फत उद्योजक घडविण्यासाठी COEP चे Bhau Institute of Innovation, Entrepreneurship & Leadership, पुणे यांचेमार्फत ‘‘नवकल्पनांवर आधारित उद्योग उभारणी प्रशिक्षण’’ राबविण्याकरीता दिनांक ०१/१२/२०२५ रोजी सामंजस्य करार करण्यात आलेला आहेत.

२.Maharashtra Centre for Entrepreneurship Development, (MCED), छ. संभाजीनगर

यांचेमार्फत “निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण” राबविण्याकरीता सामंजस्य करार करणे प्रस्तावित आहे.
३. शेतकरी, तरुण व महिला यांचेसाठी शेतीपूरक व्यवसाय करण्याकरीता National Institute of Just Harvest Technology (NIPHT), पुणे यांचेमार्फत हरितगृह व्यवस्थापन, शेडनेट उभारणी व लागवड व्यवस्थापन, शीतसाखळी व्यवस्थापन, हॉर्टीकल्चर एक्सपोर्ट टेनिंग कोर्स, अन्न प्रक्रिया व उद्योजकता विकास या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देण्याकरीता दिनांक २७/११/२०२५ रोजी सामंजस्य करार करण्यात आलेला आहे.
४. Maharashtra Cooperative Development Corporation Limited (MCDC), पुणे यांचेमार्फत “शेतकरी उत्पादक कंपनी क्षमता बांधणी प्रशिक्षण” रावविण्याकरीता सामंजस्य करार करणे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## विदर्भातील शेतकऱ्यांच्या शेत पिकाचे नुकसान करणाऱ्या रोही, डुक्कर या वन्य प्राण्यांना विनाअट मारण्याची परवानगी देणेबाबत

**(२) ४०५३ (१७-०७-२०२५) श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील शेतकऱ्यांच्या शेतपिकांचे रोही व जंगली डुक्कर या वन्य प्राण्यांमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याने अशा प्राण्यांना विनाअट मारण्याची परवानगी देण्याबाबतची मागणी मा.वन मंत्री यांच्याकडे वर्धा येथील लोकप्रतिनिधींमार्फत दिनांक २५ मे, २०२५ रोजी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रोही व जंगली डुक्कर या वन्य प्राण्यांमुळे उभ्या शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्यामुळे शेतकरी त्रस्त झालेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रमाणे सादर केलेल्या निवेदनानुसार शेतकऱ्यांची पिके वाचविण्यासाठी रोही व जंगली डुक्कर यांना विनाअट मारण्याची परवानगी देण्यासंदर्भात शासनस्तरावर कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.गणेश नाईक (०८-०१-२०२६) :** (१) या वृत्तांतर्गत मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर, वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर, वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र, गोंदिया या संरक्षित क्षेत्राचा समावेश आहे. परंतु, लोकप्रतिनिधीमार्फत रोही व जंगली डुक्कर वन्यप्राण्यांना विनाअट मारण्याबाबत निवेदन प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले नाही.
(२) जंगलालगत असलेल्या शेतपिकांची वन्यप्राणी, जंगली डुक्कर व रोही यांचेकडून नासधूस होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. महसूल व वन विभाग दिनांक ३० जानेवारी, २०२४ च्या अधिसूचना वन्यप्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान याकरीता नुकसान भरपाई प्रदान करणे

अधिनियम २०२३ अन्वये शेतपीक नुकसान भरपाई देण्यात येत आहे.
(३) जंगली डुक्कर व रोही हे भारतीय वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ अंतर्गत संरक्षित प्राणी आहेत. त्यामुळे विनाअट मारण्यास परवानगी देणे शक्य नाही. तथापि, महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक दिनांक २२ जुलै, २०१५ अन्वये शेतपिकास धोकादायक ठरलेल्या रानडुक्कर व रोही यांचा बंदोबस्त करण्याकरीता शासन परिपत्रकामध्ये नमुद अटी व शर्तींचे अधिन राहून वन्यजीव विभाग वगळुन रान डुक्कर व रोही यांचे पारध करण्याची परवानगी सदर शासन परिपत्रकाद्वारे देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शासकीय/निमशासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना विविध विभागात कंत्राटी पध्दतीने घेण्याबाबत

**(३) ४६२७ (२६-०८-२०२५) श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीची वय ५८ वरून ६० वर्ष करण्याचा निर्णय झाला नसला तरी शासकीय / निमशासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना विविध विभागात कंत्राटी पध्दतीने घेण्याबाबत शासनाने निर्णय घेतल्याचे दिनांक १५ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कर्मचाऱ्यांना वयाच्या ६५ वर्षापर्यंत आणि त्यानंतरही क्षमता असल्यास वयाच्या सत्तरीपर्यंत काम करता येणार असणे, सरकारी आस्थापनांमध्ये अधिकाऱ्यांच्या एकूण पदांच्या १०% पदावर निवृत्त अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार असल्याने या अधिकाऱ्यांना ८० हजार रुपयांपर्यंत वेतन देण्याची तरतूद शासनाने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कालावधीत त्यांची निवृत्तीवेतन बंद करण्याची गरज असतानाही, शासनाने निवृत्त अधिकाऱ्यांनाच परत एकदा संधी दिल्याने राज्यातील सुमारे १५ लाखांपेक्षा जास्त सुशिक्षित बेरोजगार तरुण- तरुणी रोजगारापासून वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या कंत्राटी भरतीबाबत कर्मचारी संघटनांचा तीव्र विरोध असून शासकीय कर्मचाऱ्यांचे निवृत्तीचे वय ६० वर्षे करून सर्व शासकीय आस्थापनात नवीन कायमस्वरूपी पद भरती करण्याची मागणी संघटना करित असतानाही प्रशासन त्याकडे दुर्लक्ष करित आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या अनुषंगाने सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना कंत्राटी पध्दतीने नियुक्ती न देता सुशिक्षित बेरोजगार तरुणांना रोजगार देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही/उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१३-०३-२०२६) :** (१) शासकीय /निमशासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना विविध विभागात कंत्राटी पध्दतीने घेण्याबाबत दिनांक १५ एप्रिल, २०२५ रोजीच्या सुमारास घेण्यात आलेला नसून, दिनांक १०/०६/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे, ही बाब खरी आहे.

शासकीय /निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना विवक्षित कामासाठी करार पध्दतीने नियुक्त करण्याबाबतचा निर्णय प्रथमत: दिनांक १५/०२/१९९५ रोजी घेण्यात आला. यानंतर वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचना विचारात घेऊन, दिनांक १७/१२/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये, शासकीय /निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा विवक्षित कामासाठी घेण्याबाबत एकत्रित सूचना देण्यात आल्या. सदर शासन निर्णयात वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या असून, दिनांक १७/१२/२०१६ व त्यानंतर केलेल्या सुधारणांबाबत एकत्रित सूचना, दिनांक १०/०६/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेले अधिकारी वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतात तथापि, ज्या व्यक्तींच्या सेवा चालू ठेवणे आवश्यक आहे असे मत असेल, त्यांच्या सेवा सक्षम प्राधिकाऱ्यास एकस्तर वरिष्ठ अधिकाऱ्याच्या / प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने पुढे चालू ठेवता येतात. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ७० व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकते.

सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची करार पध्दतीने नियुक्ती मंजूर पदसंख्येच्या जास्तीत जास्त १०% पदांवर करता येते.

करार पध्दतीने नियुक्तीच्या वेळी मिळत असलेले मूळ निवृत्तीवेतन व त्यावरील महागाई भत्त्यासह मिळणाऱ्या रकमेएवढी रक्कम, त्याचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येते.

(३) हे खरे नाही.

सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचे करार पध्दतीने नियुक्ती ही, नियमित स्वरुपाच्या कामकाजासाठी न करता केवळ विवक्षित कामासाठीच करण्यात येते व नियमित मंजूर पदे सेवाप्रवेश नियमानुसार विहित केलेल्या मार्गाने नियमितपणे भरण्यात येतात.

(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मार्टी संस्था कार्यान्वीत करण्याबाबत

**(४) ४८७८ (१७-१२-२०२५) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.संजय केणेकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने : तारांकित प्रश्न क्रमांक ४३६९ ला दिनांक ११ जुलै, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अल्पसंख्याक समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक उन्नतीसाठी शासनाने दिनांक २२ ऑगस्ट २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये "महाराष्ट्र अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था" (मार्टी MRTI) स्थापना केली असून सदर शासन निर्णयात संस्थेकरीता आर्थिक तरतूद व पदनिर्मिती करुनही अद्याप संस्था सर्वकष कार्यान्वित झाली नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त संस्थेसाठी ११ पदे मंजूर करून ६.२५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच या आयुक्तालयासाठी आयुक्त म्हणून एक आयएएस अधिकारी व इतर ३५ अधिकारी, कर्मचारी असा आकृतिबंध मंजूर करण्यात करण्यात आला असूनही मार्टीच्या माध्यमातून अल्पसंख्यांक समाजातील युवकांना व विद्यार्थ्यांना प्रशिक्षण व संशोधनाचे प्रत्यक्ष लाभ मिळत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्थेकरीता लेखाशीर्ष उघडण्याबाबतचा प्रस्ताव मान्यतेकरीता वित्त विभागाकडे प्रलंबित असून सदर संस्थेची स्थापना होऊनही पदभरती प्रक्रिया राबविण्यास विलंब होत असल्याने संस्थेच्या माध्यमातून अल्पसंख्याक समाजातील युवकांना व विद्यार्थ्यांना देण्यात येणारे प्रशिक्षणाचे लाभ मिळत नसल्याचे तसेच छत्रपती संभाजीनगर येथील अल्पसंख्यांक आयुक्तालयात देखील मंजूर आकृतीबंधानुसार पदभरती करण्यात आली नसल्याने आयुक्तालयाचे बरेच कामकाज प्रलंबित असल्याचे त्याच दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्थेतील व छत्रपती संभाजीनगर अल्पसंख्याक आयुक्तालय येथील पदभरती करुन संस्था तातडीने कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती सुनेत्रा पवार (१०-०३-२०२६) :** (१), (२), (३) व (४) नाही, हे खरे नाही.

अल्पसख्यांक विकास विभागाच्या दिनांक २२/०८/२०२४ च्या शासन निर्णयान्वये अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था (MRTI) स्थापन करण्यात आली आहे. सदर कार्यालयासाठी ११ पदे निर्माण करण्यासही मान्यता देण्यात आली आहे. सदर पदांचे सेवाप्रवेश नियम अंतिम होऊन नियमित पदभरती होईपर्यंत सदर पदे प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत दिनांक १३/०१/२०२६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर संस्थेचे कार्यालय तात्पुरत्या स्वरुपात “हज हाऊस,छत्रपती संभाजीनगर” येथे सुरु करण्यास मान्यता देण्यात आली असून संस्थेचे नोंदणी अधिनियम, १८६० अंतर्गत नोंदणी करणे व इतर बाबींची कार्यवाही करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी कामकाज सुरु केले आहे. अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था (MRTI)” या संस्थेसाठी नवीन लेखाशीर्ष उघडण्यात आले असून हिवाळी अधिवेशन २०२५ मध्ये पुरवणी मागणीद्वारे रुपये ३.१२ कोटी मंजूर करण्यात आले आहेत. अल्पसंख्यांक आयुक्तालयातील पदांचे सेवाप्रवेश नियम तयार करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. आयुक्तालयातील आयुक्त पदावर भा.प्र.से. संवर्गातील अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच सहायक आयुक्त, अधीक्षक, २ लिपिक-टंकलेखक यांची उसनवारी तत्वावर /अतिरिक्त कार्यभाराने नियुक्ती करण्यात आली आहे. काही पदे प्रतिनियुक्तीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच लिपिक-टंकलेखक व शिपाई संवर्गातील पदे कंत्राटी स्वरुपात भरण्यात येत आहेत. सद्य:स्थितीत अल्पसंख्याक समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक विकासाकरीता विविध योजनांची अंमलबजावणी शासनस्तरावरुन करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कडेगाव (जि.सांगली) तालुक्यातील चिंचणी मंडळातील शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्याबाबत

**(५) ५२८५ (१४-१२-२०२५) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कडेगाव (जि.सांगली) तालुक्यातील चिंचणी मंडळातील तलाठी, मंडलाधिकारी मुख्यालयात न राहता इतर ठिकाणांहून ये-जा करीत असल्यामुळे मंडळातील तसेच देवराष्ट्रे येथील शेतकऱ्यांची शेती विषयक विविध कामे प्रलंबित असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करुन चिंचणी मंडळातील शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (२९-०१-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) तथापि, तहसिल कार्यालय, कडेगांव यांचेकडून संबंधितांना लेखी पत्र देऊन मुख्यालयात राहणेबाबत तसेच जनतेची कामे वेळेवर पार पाडून कोणतीही तक्रार प्राप्त होणार नाही याची दक्षता घेणेबाबत समज देण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाज्योती संस्थेला १५०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्याबाबत

**(६) ५४२१ (१७-१२-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाज्योती संस्थेला शासनाकडून १५०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधीतून इतर मागासवर्ग प्रवर्गासाठी वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती आणि इतर सर्व योजना राबविण्यात येणार असल्याने याबाबतचा संपूर्ण आराखडा महाज्योती संस्थेने तयार करून शासनास सादर केला आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (१३-०३-२०२६) :** (१) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये महाज्योती या संस्थेकरीता रुपये ६२८.६४ कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे.

(२) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात महाज्योती संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण, कौशल्य विकास प्रशिक्षण, व्यवसायिक वैमानिक प्रशिक्षण, पीएचडी अधिछात्रवृत्ती व वसतिगृहात प्रवेशित विद्यार्थ्यानीना दरमहा निर्वाह व भोजन भत्ता इत्यादी योजनांबाबतचा वार्षिक कृती आराखडा महाज्योती कार्यालयामार्फत दिनांक २६/०५/२०२५ रोजी शासनास सादर करण्यात आलेला आहे.

इतर मागास वर्ग प्रवर्गासाठी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती आणि इतर योजना राबविण्याची कार्यवाही संचालक इतर मागास बहुजन कल्याण् विभाग पुणे यांच्या मार्फत करण्यात येते
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कुऱ्हा (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) येथील मंडळ अधिकारी यांनी ७/१२ च्या उताऱ्यावर नोंदीसाठी पैशाची मागणी केल्याबाबत

**(७) ५४३४ (१४-१२-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुऱ्हा येथील (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) मंडळ अधिकारी यांनी ७/१२ च्या उताऱ्यावर नोंदीसाठी नियमबाह्य पैशाची मागणी केली असल्याने त्यांचेवर कार्यवाही होणेसंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १७ सप्टेंबर, २०२५ रोजी जिल्हाधिकारी जळगाव यांचेकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने दोषी मंडळ अधिकारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (२९-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) जिल्हाधिकारी, जळगांव कार्यालयाच्या दिनांक १७/०९/२०२५ रोजीच्या पत्रान्वये, संबंधित मंडळ अधिकारी, कुऱ्हा, ता.मुक्ताईनगर यांचेविरूध्द त्यांनी, ७/१२ उताऱ्यावर खरेदीखताप्रमाणे नोंद केली नाही या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करून अहवाल सादर करणेबाबत उपविभागीय अधिकारी भुसावळ भाग भुसावळ यांना कळविण्यात आले आहे. याअनुषंगाने उपविभागीय अधिकारी भुसावळ भाग भुसावळ यांचेकडून प्राप्त प्राथमिक अहवालानुसार जिल्हाधिकारी, जळगांव कार्यालयाच्या दिनांक २४/११/२०२५ व दिनांक ३१/१२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये, संबंधित मंडळ अधिकारी, कुऱ्हा यांची दफ्तर तपासणी करून अहवाल सादर करणेबाबत उपविभागीय अधिकारी भुसावळ भाग भुसावळ यांना कळविण्यात आले असून, त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाज्योतीने प्रशिक्षणार्थींची संख्या कमी केल्याबाबत

**(८) ५८०० (१७-१२-२०२५) श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रशिक्षण मिळावे याकरीता सन २०१९ मध्ये स्थापन केलेल्या महाज्योतीने प्रशिक्षणार्थींची संख्या कमी केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संस्थेने युपीएससीच्या १०० व एमपीएससीच्या ४०० जागा निश्चित करुन महाज्योतीवर प्रशिक्षणार्थीवर कपातीचे संकट ओढावले असून महाज्योतीवर बंधन घातल्याने रोष व्यक्त होत आहे, हे ही

खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे शासनाने पुर्ननिर्णय घेवून महाज्योतीला पूर्वीप्रमाणे स्वायत्तता देण्याबाबत व महाज्योतीच्या प्रशिक्षणार्थीच्या जागा पूर्ववत करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (१३-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.
महाज्योती संस्थेने प्रशिक्षणार्थी संख्या कमी करण्याचा कोणताही निर्णय घेतलेला नाही.
(२) व (३) अंशत: खरे आहे.
मा.मुख्य सचिव, महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११ सप्टेंबर, २०२५ रोजी पार पडलेल्या बैठकीत बार्टी, सारथी, टार्टी व महाज्योती या या प्रत्येक संस्थेकरीता UPSC प्रशिक्षणासाठी १०० व MPSC प्रशिक्षणासाठी ४०० विद्यार्थी संख्या मर्यादित असावी असे निर्देश देण्यात आले होते.

तथापि, सदर प्रशिक्षणाकरीता विद्यार्थ्यांच्या अर्जाची संख्या लक्षात घेऊन महाज्योतीच्या मा.संचालक मंडळाने दिनांक २०/०१/२०२६ रोजीच्या बैठकीमध्ये UPSC प्रशिक्षणासाठी ४०० व MPSC प्रशिक्षणासाठी १००० विद्यार्थी संख्या वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार सदर प्रशिक्षणाकरीता वाढीव विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात विद्यार्थ्यांची निवड यादी दिनांक २३/०१/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून दिनांक ०२/०२/२०२६ रोजी पासून सदर प्रशिक्षणाकरीता निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण योजनेचा लाभ देण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील भोगवटादार वर्ग २, धारणाधिकार वर्ग १ मध्ये रुपांतरित करणेबाबतचा शासन निर्णय व आदेश स्वातंत्र्य सैनिक व माजी सैनिकांना लागू करणेबाबत

**(९) ६११५ (१४-१२-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या महाराष्ट्र जमीन महसूल नियम, २०१९ मधील तरतुदीनुसार भोगवटादार वर्ग २ तसेच भाडेपट्टयाने प्रदान केलेली व कब्जेहक्काने दिलेली जमीन भोगवटादार वर्ग १ मध्ये रुपांतरित करण्याचा शासन निर्णय निर्गमित झाला असून सदर निर्णय केवळ कब्जेहक्काने व भाडेपट्टयाने जमिनी मिळालेल्या सोसायटींना लागू आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या भोगवटादार वर्ग २ च्या ज्या जमिनी स्वातंत्र्य सैनिक व माजी सैनिकांना उदरनिर्वाहासाठी देण्यात आल्या आहेत, सदरहू शासन निर्णय त्यांना लागू केलेला नसल्यामुळे त्यांना या नियमाचा लाभ मिळत नसल्याने राज्यातील स्वातंत्र्य सैनिक व माजी सैनिकांना सदर शासन निर्णय लागू करावा अशी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने स्वातंत्र सैनिक व माजी सैनिकांना सदर शासन निर्णय लागू करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (२०-०२-२०२६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल (भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्टयाने/ कब्जेहक्काने प्रदान केलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरित करणे) नियम, २०१९ व तदनंतर शासन अधिसूचना, दिनांक ०४ मार्च, २०२५ अन्वये सदर सुधारित नियम प्रसिध्द करण्यात आलेले असून सवलतीच्या दराने आकारावयाच्या अधिमूल्याच्या मुदतीचा कालावधी दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंत निश्चित करण्यात आलेला आहे.

सदर नियम हे शासनाने कब्जेहक्काने तसेच भाडेपट्टयाने शेती/ अकृषिक, निवासी, वाणिज्यिक अथवा औद्योगिक प्रयोजनासाठी प्रदान केलेल्या जमिनींना तसेच शासनाने कब्जेहक्काने तसेच भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना लागू आहे.

(२) व (३) शासन अधिसूचना दिनांक ४/०३/२०२५ प्रसिध्द करण्यात आलेले नियम हे शासनाने कब्जेहक्काने / भाडेपट्टयाने शेती / अकृषिक, निवासी, वाणिज्यिक अथवा औद्योगिक प्रयोजनासाठी प्रदान केलेल्या शासकीय जमिनींना लागू आहेत. तथापि, माजी सैनिक, स्वातंत्र्य सैनिक अथवा ज्यांना महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम,१९६१ अन्वये प्रदान केलेल्या जमिनींना सदर नियम लागू नाहीत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोकण विभागात जी.डी.सी. ॲण्ड ए. व सी.एच.एम. परीक्षा केंद्र सुरू करण्याबाबत

**(१०) ६८६६ (०२-०३-२०२६) श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय सहकार व लेखा पदविका (जी.डी.सी. ॲण्ड ए.) तसेच सहकारी गृहनिर्माण व्यवस्थापन प्रमाणपत्र (सी.एच.एम.) या परीक्षांचे परीक्षा केंद्र कोकण विभागातील रत्नागिरी जिल्ह्यात सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव शासकीय सहकार व लेखा पदविका महामंडळामार्फत शासनास सादर करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव शासकीय सहकार व लेखा पदविका महामंडळाकडून शासनास कधी सादर करण्यात आला आहे; तसेच रत्नागिरी जिल्ह्यात जी.डी.सी. ॲण्ड ए. व सी.एच.एम. या परीक्षांचे स्वतंत्र परीक्षा केंद्र प्रत्यक्षात कधी सुरू करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील (१७-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) कोकण विभागातील रत्नागिरी जिल्ह्याच्या ठिकाणी जी.डी.सी. ॲण्ड ए. व सी.एच.एम. परीक्षा केंद्र सुरु करणेबाबतचा प्रस्ताव सहकार आयुक्त अध्यक्ष असलेल्या शासकीय सहकार व लेखा पदविका मंडळ, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून दिनांक ६/०३/२०२५ रोजी शासनास प्राप्त झाला असून शासनपत्र दिनांक १२/०६/२०२५ अन्वये रत्नागिरी येथे नवीन केंद्र सुरु करणेबाबत शासन मान्यता देण्यात आली आहे.

त्यास अनुसरुन " रत्नागिरी " केंद्राचा समावेश करण्यात येऊन मे २०२६ च्या जी.डी.सी. ॲण्ड ए. व सी.एच.एम. परीक्षेची अधिसूचना दिनांक ७/०१/२०२६ रोजी निर्गमित करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील कंत्राटी तासिका शिल्पनिर्देशकांना नियमित करणेबाबत

**(११) ७२९९ (०२-०३-२०२६) श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील कंत्राटी तासिका शिल्पनिर्देशकांना नियमित करण्याच्या मागणीच्या अनुषंगाने मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (मॅट), मुंबई येथे याचिका दाखल करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिनांक २७ मार्च, २०२५ रोजी अंतिम निर्णय दिला असून, त्या निर्णयामध्ये नमूद २३७ याचिकाकर्त्यांच्या सेवा नियमित करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आदेश देताना मा.न्यायालयाने याचिकाकर्त्यांपैकी ज्या कर्मचाऱ्यांच्या सेवा ५ वर्षे पूर्ण झालेल्या आहेत त्यांना तात्काळ, तसेच उर्वरित याचिकाकर्त्यांच्या सेवा ५ वर्षे पूर्ण होताच टप्प्याटप्प्याने नियमित करण्यासाठी शासन निर्णय निर्गमित करावा, असे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने सदर निर्णयाची माहिती घेऊन, मा.न्यायालयाच्या अंतिम आदेशानुसार संबंधित याचिकाकर्त्यांना प्राधान्याने शासन सेवेत नियमित करण्यासाठी आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (१३-०३-२०२६) :** (१) ते (४) राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील तासिका तत्वावरील निदेशकांनी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल केलेल्या मूळ अर्ज क्र. ४८१/२०२३ व इतर मूळ अर्जांवर मा.न्यायाधिकरणाने दिनांक २७/०३/२०२५ रोजी आदेश पारित केले आहेत.

मा.न्यायाधिकरणाच्या सदरहू दिनांक २७/०३/२०२५ च्या आदेशान्वये या विभागाचा दिनांक ७/०४/२०२२ चा शासन निर्णय रद्द करण्यात आला आहे. ज्याव्दारे ५८५७ बाह्यस्त्रोताव्दारे मनुष्यबळ घेण्यात येणार होते.

सदर आदेशामुळे शासनाच्या बाह्ययंत्रणेद्वारे मनुष्यबळ घेण्याच्या धोरणास बाधा निर्माण होत असल्यामूळे विधी अधिकारी, वाहन चालक, पहारेकरी, सफाईगार इत्यादी सेवांवर विपरीत परिणाम होत असल्याने मा.न्यायाधिकरणाच्या आदेशाविरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे अपिल दाखल करण्यात आले आहे. सदरहू अपिल सध्या न्यायप्रविष्ट आहे.

तथापि, राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये तासिका तत्वावर नियुक्त केलेल्या निदेशकांना, जे सद्य:स्थितीत कार्यरत आहेत आणि ज्यांनी ५ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक सेवा केलेली आहे, त्यांना शासन सेवेत नियमित करता येईल किंवा कसे, याबाबत शासन स्तरावर विचारविनिमय सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

## नागपूर शहरातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ प्रशासनातर्फे आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेतील पदक जिंकणाऱ्या खेळाडूंना वार्षिक पुरस्कार वितरण केले नसल्याबाबत

**(१२) ७९५९ (०२-०३-२०२६) श्री.संदीप जोशी, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ प्रशासनातर्फे आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेतील पदक जिंकणाऱ्या खेळाडूंना मागील २ वर्षापासून (सन २०२३-२४) वार्षिक पुरस्कार वितरण करण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठाचे नाव उज्वल करणाऱ्या खेळाडूंमध्ये पूरस्कार न मिळाल्यामुळे नाराजीचे वातावरण पसरले आहे,तसेच विद्यापीठातर्फे पुरस्काराची यादी तयार करण्यात आली असून पुरस्कार देण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, नागपूर विद्यापीठ प्रशासनातर्फे आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेतील पदक जिंकणाऱ्या खेळाडूंना पुरस्कार वितरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१०-०३-२०२६) :** (१) होय.

(२) नागपूर शहरातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ प्रशासनातर्फे आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत पदक जिंकणाऱ्या खेळाडूंचा सत्र २०२३-२४ व २०२४-२५ चा पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रम माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये आयोजित करण्याचे ठरले होते. परंतु, सदर कालावधीत नगर परिषद व महानगरपालिकेच्या निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू झाल्यामुळे व सदर पुरस्कार सोहळयात वार्षिक रोख पुरस्काराचे वितरण होणार असल्यामुळे, प्रस्तुत आयोजित पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रम संपन्न होऊ शकला नाही.

(३) सदर पुरस्कार वितरण सोहळा दिनांक २८ मार्च, २०२६ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाच्या गुरुनानक भवन, अंबाझरी रोड, नागपूर येथे नियोजित आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## कोकणातील शेतकऱ्यांच्या काजू पिकांचे नुकसान झाल्याबाबत

**(१३) ९९८९ (१७-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यात पहिल्या टप्प्यात थंडीचा अभाव, अवकाळी पाऊस, ढगाळ वातावरण आणि उच्च तापमानाचा मारा अशा प्रकारच्या वातावरणीय बदलाचा काजू पिकांवर परिणाम होवून मोठ्या प्रमाणात काजू पिकांचे नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोकणातील काजू उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली

आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील)(०६-०१-२०२६) :** (१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात अशी बाब निदर्शनास आली नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही
(३)प्रश्न उद्भवत नाही.

---

## समाज कल्याण विभागाच्या आडगाव शिवार (नाशिक) येथील वसतिगृहाचा पाणीपुरवठा नाशिक महानगरपालिकेने बंद ठेवल्याबाबत

**(१४) २०५३६ (११-०७-२०२३) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आडगाव शिवार,नाशिक येथील समाज कल्याण विभागाच्या वस्तीगृहास होणारा पाणीपुरवठा नाशिक महानगरपालिकेने कोणतीही सूचना न देता बंद केल्याने वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना तसेच स्थानिक नागरिकांना पाण्याविना राहावे लागत असल्याची बाब माहे मे,२०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आडगाव शिवारात असलेल्या समाज कल्याण विभागाच्या वस्तीगृहास कायमस्वरूपी तातडीने पाणी देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (२४-०७-२०२३) :** (१) माहे मे, २०२३ या महिन्यात नाशिक महानगरपालिका क्षेत्रात पाईपलाईन व इतर दुरूस्तीची कामे असल्याने एक दिवस पाणीपुरवठा बंद होता व दुसऱ्या दिवशी कमी दाबाने पाणीपुरठा सुरू झाला या कालावधीत विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून टँकरव्दारे वसतिगृहास पाणीपुरवठा करण्यात आला आहे.
(२) सदर वसतिगृहास महानगरपालिकेकडून नियमित पाणीपुरवठा करण्यात येत असून, अधिकचा पाणीपुरवठा करण्यासाठी वसतिगृह परिसरात विहीर असून, बोअरवेलची व्यवस्था करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंबाझरी तलाव व नाग नदी परिसरात (जि.नागपूर) झालेल्या अतिवृष्टीमुळे मालमत्तेची हानी झाल्याबाबत

**(१५) २२८७२ (२९-०६-२०२४) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाझरी तलाव, व नाग नदी परिसरात (जि.नागपूर) येथे दिनांक २३ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास झालेल्या अतिवृष्टीमुळे पुराचे पाणी निवासी घरे, शॉपिंग मॉल, सिनेमागृहे, दुकाने, रुग्णालये, शाळा, महाविद्यालये, वसतिगृहे, रेल्वे स्थानक, बसस्थानक इत्यादि ठिकाणी शिरून नागरिकांच्या लाखों रुपयांच्या मालमत्तांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाग नदीचे प्रलंबित पुनरुज्जीवन, अंबाझरी तलावाचे संपलेले आयुष्य, स्थानिक प्रशासनाकडे दूरदृष्टीचा असलेला अभाव आणि निष्काळजीपणा, अनियोजित विकास, अनधिकृत बांधकामे यांमुळे नागपूर शहरात पुरस्थिति उद्भवली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू पुरामुळे नुकसानग्रस्त मालमत्तांचे पंचनामे शासनाने पूर्ण केले आहेत काय,
(४) असल्यास, तदनुषंगाने नुकसानग्रस्त नागपूरकरांना तातडीने नुकसानभरपाई अदा करण्यासह भविष्यात सदरहू घटनेची पुनरावृत्ति टाळण्यासाठी नागपूर शहरात शासनाने तातडीने कोणत्या ठोस उपाययोजना हाती घेतल्या वा घेण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) हे खरे नाही.
पूर परिस्थिती नियंत्रणात येण्याकरीता व अंबाझरी तलाव व धरणाचे बळकटीकरण करण्याकरीता ४ टप्प्यात काम करण्यात आले आहे.

पुरामुळे नुकसानग्रस्त मालमत्तांचे पंचनामे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहेत. महसूल व वन विभागाच्या शासन निर्णय दिनांक ३०/११/२०२३ अन्वये शासनाद्वारे निश्चित केलेल्या निकषानुसार व दरानुसार रुपये ८३८.५४ लक्ष इतका निधी नुकसानग्रस्तांकरीता शासनाद्वारे मंजूर करण्यात आला असून त्यामध्ये नुकसानग्रस्त घरांकरीता आर्थिक मदत रुपये ८५.४४ लक्ष निधीचे वितरण जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सामाजिक न्याय विभागांतर्गत अनुसूचित जातीतील मुलांच्या निवासी शाळेतील शिक्षकांना ७ व्या वेतन आयोगाचा लाभ देण्याबाबत

**(१६) २३०८३ (१६-०७-२०२४) श्री.किरण सरनाईक, श्री.विक्रम काळे, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामाजिक न्याय विभागांतर्गत असलेल्या अनुसूचित जातीतील मुलांच्या निवासी शाळेतील शिक्षक अद्यापपर्यंत ७ व्या वेतन आयोगाच्या लाभांपासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,तदनुसार राज्यातील सामाजिक न्याय विभागांतर्गत असलेल्या अनुसूचित जातीतील मुलांच्या निवासी शाळेतील शिक्षकांना ७ व्या वेतन आयोगाचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.संजय शिरसाट (०६-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सामाजिक न्याय विभागांतर्गत शासकीय निवासी शाळेतील प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या वेतन संरचनेत शासन निर्णय, दिनांक २०/०९/२०२१ अन्वये सुधारणा करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयाविरूध्द मा.उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद व मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर

येथे याचिका दाखल केली आहे. सदर प्रकरणी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने अपिलकर्त्याचे म्हणने ऐकुण निर्णय घेण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य पुणे कार्यालयाने सुनावणी घेतली असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्याक्रमाच्या शिक्षकांची रिक्त पदे भरणेबाबत

**(१७) २३४४२ (२०-०७-२०२४) श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील उच्च माध्यमिक व्यवसाय (एच.एस.सी.व्होकेशनल) अभ्यासक्रम संवर्गातील शिक्षकांची जवळपास ७ हजारांहून अधिक पदे सन २०१७ पासून रिक्त असल्यामुळे उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमातील काही अभ्यासकेंद्र बंद होत असून विद्यार्थांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू एचएससी व्होकेशनल शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत तसेच तासिका तत्त्वावरील शिक्षक नेमणुकीबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (११-०३-२०२६) :** (१) व (२) +२ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाचे (HSC Vocational) अन्य पर्यायामध्ये रुपांतर करण्याच्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने शासनास शिफारस करण्यासाठी मा.श्री.विक्रम वसंतराव काळे, विधानपरिषद सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय दिनांक १६/०३/२०२० अन्वये समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून, सदर अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे. सदर अहवालावरील कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर, त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ना. म. जोशी मार्ग मुंबई येथील बीडीडी चाळीतील राहिवाशांच्या पुनर्वसनाबाबत

**(१८) २३९६६ (०५-०९-२०२४) श्री.प्रसाद लाड, श्री.राजहंस सिंह : तारांकित प्रश्न क्रमांक १७५९५ ला दिनांक १० मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ना. म. जोशी मार्ग, मुंबई येथील बीडीडी चाळीच्या पहिल्या व दुसऱ्या टप्प्यातील म्हाडाने सुरु केलेले पुनर्विकासाचे काम सन २०२१ पासून प्रलंबित असून वरळीतील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातील सदनिकाधारकांना घरामागे पार्किंग देण्याचा निर्णय म्हाडाने घेतला असून म्हाडाने नायगाव व ना.म.जोशी मार्ग येथील चाळधारकांना याचा लाभ दिला नसल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, २ हजार ५६० रहिवाशांना प्रत्येकी ५०० चौ. फुटाची घरे म्हाडाकडून माहे एप्रिल २०२६ पर्यंत बांधून देणार असून तसेच सदर बीडीडी चाळींच्या पार्किंग वाटपात म्हाडाकडून दुजाभाव करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, म्हाडाकडे संक्रमण शिबीरे उपलब्ध नसल्यामुळे रहिवाशांचे स्थलांतर करण्यात अडचणी निर्माण होत असून, म्हाडाने प्रत्येक रहिवाशाला २५ हजार रुपये घरभाडे देण्याची तयारी दर्शवलेली असताना रहिवाशांना भाड्याऐवजी पर्यायी घरे हवी असल्याने त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.एकनाथ शिंदे (०४-०३-२०२६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
सद्य:स्थितीत ना.म.जोशी मार्ग बी.डी.डी. चाळ पुनर्वसन प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.
वरळी प्रकल्पाप्रमाणे नायगाव व ना.म. जोशी मार्ग प्रकल्पांमध्ये अतिरिक्त जमीन उपलब्ध नसल्यामुळे तसेच नियोजनात्मक मर्यादेमुळे चाळ धारकांना प्रत्येक पुनर्वसन घरामागे पार्किंग देणे शक्य नाही.
मर्यादित पार्किंगची उपलब्धता लक्षात घेता पार्किंग वाटपात म्हाडाकडून कोणताही दुजाभाव करण्यात आलेला नाही.
(३) संक्रमण शिबिरांची संख्या पुरेशी नसल्यामुळे म्हाडाने प्रतिमहिना रुपये २५,०००/- भाड्याचा पर्याय रहिवाश्यांपुढे ठेवला आहे. तसेच स्थलांतरण केल्यानंतर लगेचच ११ महिन्यांचे आगाऊ भाडे रहिवाश्यांना एकरकमी देण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भुषण पुरस्कार प्राप्त कार्यकर्त्यांना वातानुकूलीत बसेसमधुन मोफत प्रवास सवलत देण्याबाबत

**(१९) २४१९० (१६-०७-२०२४) श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागमार्फत सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तिंना देण्यात येणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण व इतर पुरस्कारर्थींना शासनामार्फत साधी बस / निम आराम / आराम / रातराणी इ. एस.टी. च्या बसेसमधून मोफत प्रवास सवलतीचा पास देण्यात येतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र शासनातर्फे वयाची ६५ वर्षे पूर्ण करणाऱ्या जेष्ठ नागरीकांना ५० टक्के सवलत व ७५ वर्षे पूर्ण करणाऱ्या वयोवृद्धांना १०० टक्के सवलत एस.टी महामंडळाच्या साधी / आराम / निम-आराम / रातराणी । शिवशाही / शिवनेरी तसेच सर्व वातानुकूलीन एस.टी. बसेस मध्ये दिली जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने समाज भूषण पुरस्कार देऊन सन्मान केलेल्या पुरस्करर्त्यांना एस.टी.च्या वातानुकुलीत बसेसमधून मोफत प्रवास सवलत दिली जात नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार व तस्सम इतर पुरस्कार प्राप्त झालेल्या (समाजसेवा करणाऱ्या) व्यक्तिंना ज्येष्ठ नागरिकांना देण्यात येणाऱ्या सवलतीप्रमाणे शिवशाही, शिवनेरी व इतर वातानुकुलीत असलेल्या बसेसमधून मोफत प्रवास करु देण्याबाबत शासनाची भुमिका काय आहे तसेच त्या बाबतचा सुधारीत शासन निर्णय निर्गमित करुन एस.टी.च्या सर्व बसमधून वातानुकूलीत बससह प्रवास करण्यास सवलत देण्याबाबतचा सुधारीत शासन निर्णय निर्गमित करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (२८-०२-२०२६) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कारार्थी व त्यांचे एक साथीदार यांस राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बसेसमध्ये १०० टक्के सवलत अनुज्ञेय करण्याबाबतचा प्रस्ताव राज्य परिवहन महामंडळाने शासनाच्या गृह (परिवहन) विभागास सादर केलेला असून पुढील कार्यवाही सुरु आहे
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सामाजिक न्याय विभागांतर्गत वेगवेगळया अभ्यासक्रमामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेशाबाबत

**(२०) २४३२५ (१६-०७-२०२४) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यामध्ये सन २०२३-२४ या शैक्षणिक सत्रापासून सामाजिक न्याय विभागांतर्गत वेगवेगळया अभ्यासक्रमामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेशाकरीता ऑनलाईन पध्दतीने प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, यानुसार पारंपारिक अभ्यासक्रमामध्ये तसेच गैरपारंपारिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तारखांमध्ये मोठ्या प्रमाणात तफावत असल्यामुळे तसेच एकूण शासकीय वसतिगृहाची संख्या कमी असल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रक्रिया करुन शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही यासाठी कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (०५-०३-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे. सन २०२४-२५ पासून महाआयटी मार्फत ऑनलाईन पोर्टल सुरू करण्यात आलेले आहे.
(२) अंशत: खरे आहे.
शैक्षणिक संस्थांमधील प्रवेश हे शालेय विभाग (इ.८ वी ते १०वी), कनिष्ठ महाविद्यालयीन विभाग (इ.११ वी, १२ वी), बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम आणि व्यावसायिक अभ्यासक्रम यानुसार चार टप्प्यात होत असतात.

त्यानुसार शासकीय वसतिगृहाचे प्रवेश हे त्या त्या वर्षातील वसतिगृहात उपलब्ध असणाऱ्या रिक्त जागांवर वरील अभ्यासक्रमासाठी आरक्षीत असलेल्या वसतिगृहातील जागांवर वरील अभ्यासक्रमानुसार वेगवेगळया वेळी होत असतात.

(३) वेळोवेळी वसतिगृह प्रवेशाच्या ऑनलाईन प्रवेशासाठी मुदतवाढ देण्यात येऊन तांत्रिक कारणामुळे ऑनलाईन अर्ज करू न शकणाऱ्या विद्यार्थ्यांचे अर्ज ऑफलाईन पध्दतीने स्विकारण्यात आलेले आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून तसेच वसतिगृह प्रवेशाअभावी विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून अशा विद्यार्थ्यांना निवास, भोजन व शैक्षणिक साहित्य स्वत: उपलब्ध करून घेण्यासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना दिनांक ०६ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये सुरू करण्यात आलेली आहे. त्या अंतर्गत आर्थिक लाभ देण्यात येतो. तसेच तालुकास्तरावरील विद्यार्थ्यांचे वसतिगृह प्रवेशाअभावी विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक २६/१२/२०२४ च्या शासन निर्णयान्वये या योजनेची व्याप्ती तालुकास्तरापर्यंत वाढविण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.